रे. फौजदारी खटला क्र. <u>२४४/२०२३</u>
सरकार विरूद्ध निखील व अन्य एक
**निशाणी २१**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ ची जबानी</u>**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नाव : विक्की शंकर कहार
वय : २६ वर्षे,
धंदा : मासे विक्रेता,
राहणार : टाकपुरा, अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे विशेष सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. एस. राउत यांचेमार्फत —**

पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी बोलाविले नव्हते. पोलीसांनी मला पोलीस ठाण्यात सही करण्यासाठी बोलाविले होते. पोलीसांनी माझेसमक्ष काहीही जप्त केले नाही. पोलीसांनी माझे समक्ष पंचनाम्याची कोणतीही कारवाई केली नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला त्यावर माझी सही आहे. परंतु मला मजकुर मला माहित नाही. आता मला जप्ती पंचनामा दाखवला त्यावर माझी सही आहे. परंतु त्यातील देखील मजकुर मला माहित नाही.

(***साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली***.)

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ३०/०७/२०२३ रोजी पोलीसांनी मला टाकपुरा येथील रोडवर घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझेसमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला व तो मला वाचुन दाखवला व त्यानंतर मी त्यावर सह्या केल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर सांगितला होता व तो खरा व बरोबर आहे. घटनास्थळ पंचनाम्यास **निशाणी २२** देण्यात येते.

३. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझेसमक्ष आरोपी क्र. २ च्या ताब्यातुन दि. ३०/०७/२०२३ रोजी एक लोखंडी रॉड जप्त केला होता. हे म्हणणे खरे आहे की, जप्तीची कागदपत्रे माझे समक्ष तयार करण्यात आली होती. मी कशावर सह्या केल्या हे मला सांगता येणार नाही. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी** — दोन्ही आरोपीतर्फे ॲड. श्री. एस. जी. कुळकर्णी यांचे मार्फत.

४. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादं काजल ही माझी मामे—बहिण आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा निशाणी २२ मध्ये काय लिहिले हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला सह्या करण्यास सांगितल्या म्हणुन मी सह्या केल्या. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी जप्ती पंचनाम्यात काय लिहिले हे देखील मला माहित नाही. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी** — काही नाही.

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.

दि. ३१.०७.२०२५
अकोट

**RCC No. 244/2023**
**Evidence/Exh. 21**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F file Evidence are same word to word as per the original evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | P. N. DURATKAR |
| Court Name | : | 2nd Joint Civil Judge (Jr.Dn.) & JMFC, Akot, Tq. Akot, Dist. Akola |
| Date of decision | : | 31/07/2025. |
| Evidence Signed by P.O on | : | 31/07/2025. |
| Evidence Uploaded on | : | 02/08/2025. |